
# कृषिपूरक उद्योगांसाठी ज्ञान आणि कौशल्य महत्त्वाचे...



**नि**त्यनियमाप्रमाणे गणपत देवाचे दर्शन घेऊन पारावर संपतची वाट पाहात बसला. संपतही देवदर्शन आटोपून गणपतजवळ बसत म्हणाला, ''का रं गंपा, आज लवकर आलेला दिसतोय. बऱ्याच वेळची वाट पाहात होता की काय?''

यावर हसून गणपत म्हणाला, ''तसंच म्हण बघ, कारण बराच वेळ झाला मी आलोय. आज काही विशेष काम नाही. मग विचार केला जावे लवकर, देवदर्शन घ्यावे आणि बसावे निवांत.''

संपतही हसून म्हणाला, ''म्हणजे गंपा तुला आता काहीही काम राहिलं नाही! शेतीमध्ये तू आता निवांत झाला आहे त्यामुळे मला वाटतंय तुला एखादा धंदा वगैरे सुरू करून द्यावा.''

खरं तर संपतनेही हसतच गणपतकडे हा विषय काढला. परंतु गणपत सिरियस होऊन बोलू लागला, ''हे बघ संपा, फक्त पिकांचे उत्पादन घेऊन मला शेती परवडत नाही हे तुलाही माहीत आहे. पिकांच्या उत्पादनाबरोबर एखादा का होईना चांगला शेतीपूरक व्यवसाय पाहिजे. कारण पीकपाणी हे पूर्णपणे निसर्गावर तसेच बाजारपेठेवर अवलंबून असते. बरं पिकांच्या उत्पादनात फार मोठी वाढ होत नाही आणि बाजारभावातही फार वाढ होत नाही. शेतीच्या उत्पादन खर्चात मात्र भरमसाठ वाढ होत चालली आहे. त्यामुळे पीक उत्पादन घेऊन फार पैसा मिळत नाही. म्हणून विचार करत होतो काही वेळ काढून शेतीला एखादा जोडधंदा सुरू करावा म्हणून.''

संपतही तेवढाच सिरिअस होऊन गणपतचे बोलणे ऐकत होता. ''तू म्हणतो ते बरोबर आहे गंपा. परंतु तू सर्वात आधी एक गोष्ट लक्षात ठेव; ती म्हणजे शेतीपूरक व्यवसाय सुरू करत असताना नीट विचार करणे महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जो व्यवसाय सुरू करायचा आहे त्याची पूर्णपणे माहिती घेऊनच त्या व्यवसायाकडे वळले पाहिजे. अनेकदा शेजारच्याने एखादा व्यवसाय केला; किंवा पेपरमध्ये छापून आले की, एखाद्याने त्या व्यवसायातून फार पैसे मिळविले, म्हणून आपण लगेच तो व्यवसाय सुरू करू नये. जो व्यवसाय सुरू करायचा आहे त्याचा भूतकाळ, वर्तमानकाळ तसेच भविष्यकाळ यांचा नीट अभ्यास करण्याची गरज आहे. या व्यवसायामध्ये काम करणाऱ्या संस्थांना भेटी देणे, त्यांच्याकडून प्राथमिक माहिती घेणे तसेच या व्यवसायात कमीतकमी मागील चार-पाच वर्षे यशस्वी झालेल्या उद्योजकांच्या प्रकल्पांना भेटी देणे गरजेचे आहे. अनेकदा एखादा व्यवसाय सुरू करून एखादा उद्योजक एक-दोन वर्षात

यशस्वी होतो. त्याचे अनुकरण इतरही करायचा प्रयत्न करतात. त्यानंतर मात्र इतर सर्व अयशस्वी होतात. म्हणून सर्व बाबींची नीट माहिती घेऊनच हा व्यवसाय सुरू केला पाहिजे.''

गणपत मध्येच संपतला थांबवत म्हणाला, ''एक सांग संपा, मला जर शेतीपूरक व्यवसाय सुरू करायचा असेल तर मी सुरुवात कशी करावी? म्हणजे काही ठोकताळे असतीलच ना?''

यावर हसून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, उदाहरणादाखल तुला सांगतो, तुला वाटतंय की शेळीपालन व्यवसाय सुरू करावा. त्यासाठी काही महत्त्वाच्या बाबी लक्षात ठेवाव्या लागतील. आजही तुझ्याकडे चार-पाच शेळ्या आहेत. पण चार-पाच शेळ्या पाळणे म्हणजे हा व्यवसाय करणे असे नव्हे. शेळ्यांचा व्यवसाय करायचा असेल, त्यापासून महिन्याला- वर्षाला काही प्रमाणात आर्थिक फायदा मिळवायचा असेल; तर त्या प्रकल्पामध्ये शेळ्यांची कमीतकमी संख्या ५०-१०० असणे महत्त्वाचे असते. तेवढी संख्या असेल तरच तो व्यवसाय फायद्याचा होतो, नाही तर अर्धवट स्वरुपाचा प्रकल्प तोट्यातच जाणार. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे प्रकल्प सुरू करताना तो तंत्रशुद्ध पद्धतीनेच सुरू केला पाहिजे. यासाठी त्या व्यवसायाचे सविस्तर तांत्रिक ज्ञान तसेच त्या व्यवसायाचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षण घेतले पाहिजे. म्हणूनच कोणताही व्यवसाय सुरू करण्याआधी, त्या व्यवसायाचे प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षण देणाऱ्या चांगल्या संस्थेची निवड करून, तेथे जास्तीत जास्त वेळ देऊन प्रशिक्षण घेतले पाहिजे. आपल्याला प्रशिक्षण घ्यायला वेळ नाही; त्या व्यवसायाचे वडिलोपार्जित ज्ञान आहे, इतरांकडून चांगली माहिती घेतली आहे किंवा मला अमूक-तमूक व्यक्ती मार्गदर्शन करणार आहे, अशा भ्रामक मानसिकतेमध्ये राहून तो व्यवसाय कधीच सुरू करू नये. व्यवसाय सुरू करायला सहा महिने- वर्षभर वाट पाहावी लागली तरी चालेल; परंतु परिपूर्ण ज्ञान आणि कौशल्य असल्याशिवाय तो व्यवसाय सुरू करू नये! तसेच व्यवसाय सुरू करत असताना त्यामध्ये अर्धवटपणा न ठेवता तो पूर्णपणे शास्त्रोक्त पद्धतीने असावा.''

गणपतने मान डोलावत संपतच्या बोलण्याला होकारार्थी उत्तर दिले, ''मला सांग संपा, अनेकांनी अनेक शेतीपूरक व्यवसाय सुरू केले आणि एक-दोन वर्षांतच त्यांना कुलूप लावले. ज्यांचे अनुकरण केले त्यांचे व्यवसाय सुरू आहेत. परंतु ज्यांनी नंतर सुरू केले त्यांनी मात्र बंद केले, हे मला मात्र नाही समजले.''

यावर हसतच संपत म्हणाला, ''ज्यांनी व्यवसाय सुरू केला त्यांनी अर्धवट माहिती घेऊनच अनुकरण केले! अशांचा स्वभावच फार चंचल असतो. सतत नवीन नवीन शोधत असतात. नवा व्यवसाय सुरू करावा असे त्यांना वाटते. पण व्यवसाय सुरू केल्यानंतर एक-दोन वर्षांत त्यांना जाणीव होऊ लागते की या व्यवसायामध्ये काही दम नाही. फार काही फायदा होत नाही. मग परत ते दुसऱ्या व्यवसायाच्या शोधात बाहेर पडतात. म्हणून गंपा, तुला एक सांगतो, ज्याला व्यवसाय करायचा त्याचा स्वभाव खोल पाण्यासारखा असावा. म्हणजे शांत, धीरगंभीर, दूरचा विचार करणारा! फक्त पायाजवळ न पाहणारा, सकारात्मक विचार करणारा, ज्ञान आणि कौशल्याचा भुकेला! दुसऱ्यांचे ऐकून घेणारी आणि स्वत:ला फार हुशार न समजणारी जी व्यक्ती असते ती व्यवसायामध्ये अनेकदा यशस्वी होते. शेतीपूरक व्यवसाय सुरू करत असताना तो सुरू केल्यानंतर कमीतकमी पाच वर्षे सुरू ठेवला पाहिजे. कारण पहिली एक-दोन वर्षे हा त्या व्यवसायाचा पाया बांधायला लागतात. पुढील दोन-तीन वर्षे त्या व्यवसायाची पूर्णपणे बांधणी होते आणि नंतरच आपल्याला त्या व्यवसायाचा कळस म्हणजे फायदा बघायला मिळतो. म्हणून पायावरच कळस बांधायला निघालेले व्यावसायिक अनेकदा अयशस्वी होतात. पूर्णपणे मंदिर बांधल्यानंतर त्यावर कळस चढवला तरच पूर्ण देवालय होते. म्हणून सांगतो गंपा, व्यवसाय सुरू केल्यानंतर पाच वर्षे आपल्याला किती फायदा- तोटा झाला यावर फार विचार करीत बसण्यापेक्षा, पुढे या व्यवसायामध्ये आपल्याला स्थिरस्थावर व्हायचे आहे याचाच विचार करून तो व्यवसाय सुरू ठेवणे महत्त्वाचे आहे.''

आता मात्र गणपत हसत संपतच्या बोलण्याला दाद देत म्हणाला, ''संपा, तू अगदी लहान मुलाला सांगावे तसे सर्व सांगितले बघ! काही माणसे त्या व्यवसायात यशस्वी होतात, मग काही अयशस्वी का होतात, ते आता तुझ्या बोलण्यातून सर्व काही कळाले बघ. मला एक सांग संपा, हे व्यवसाय सुरू करण्यासाठी बँका काही कर्ज देतात काय? तसेच शासनाकडून काही मदत मिळते काय?''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, याबद्दल सविस्तर माहिती तसेच प्रकल्प आराखडा तयार करून देण्याचे काम प्रशिक्षण देणाऱ्या संस्था करतात. ते बँकेतल्या अधिकाऱ्यांना बोलावून कामाबद्दल माहितीही सांगतात. परंतु एक चांगली सुधारणा केली आहे सरकार अन् बँकांनी! पूर्वी अनेक लोक फक्त अनुदान लाटण्यासाठी व्यवसाय सुरू करत होते. परंतु आता तो व्यवसाय कमीतकमी तीन ते पाच वर्षे पूर्णपणे सुरू ठेवल्यानंतरच सरकारतर्फे दिले जाणारे अनुदान तुमच्या बँकेच्या खात्यावर जमा केले जाते. सरकारचे अनुदान तसेच बँकेचे कर्ज अनेक प्रकारच्या शेतीपूरक व्यवसायांसाठी दिले जाते. तसेच राज्य शासन, केंद्र शासन यांच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेची निवड करून तिच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये नाबार्ड, लीड बँक यांच्या माध्यमातून प्रकल्पाच्या कर्जपुरवठ्याबद्दल माहिती घेतली जाते. कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी महाविद्यालये तसेच सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून कृषिपूरक व्यवसायावर काम करण्यात येते. त्याचा फायदा आपल्याला घेता येतो.''

संपतच्या या सविस्तर मार्गदर्शनामुळे गणपत खूश होऊन म्हणाला, ''संपा पुढील चार-पाच महिन्यांत मी एखादा शेतीपूरक व्यवसाय सुरू करणार आहे. मात्र परिपूर्ण माहिती, ज्ञान आणि कौशल्य घेतल्यानंतरच. तू सांगितले तसे अर्धवट माहितीवर किंवा कोणी तरी फार पैसे मिळविले म्हणून तो व्यवसाय अर्धवटपणे सुरू करणार नाही. अर्थात तो व्यवसाय सर्व करताना मात्र माझ्या खांद्यावर तुझा हात पाहिजे बघ संपा.''

यावर हसून संपत म्हणाला, ''घाबरू नको गंपा, मी तुझ्यासोबत होतो, आहे आणि राहीन. चल चहा घेऊ आणि लागू कामाला.''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**